| | |
|---|---|
| MHAM080003612026 | *एम.जे.स. क्र.११८/२०२६*<br>*नलुबाई व ईतर –विरुध्द – निल*<br>निशाणी क्र. ०१ वरील आदेश |

## निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश

(पारित दिनांक १५ जुलै, २०२६)

**०१.** प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी नियम २ मुबंई विनियम VIII १८२७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे करिता दाखल केलेला आहे.

**०२.** अर्जदारांचे कथन आहे की, अर्जदार क्र.०१ ही मयत रामराव महादेव मानकर याची पत्नी आहे तर अर्जदार क्र.०२ व ०३ हे मयताची आपत्ये आहेत. मयत रामराव महादेव मानकर यांचा मृत्यु हा दिनांक ०४.०३.२०२६ रोजी वासेवाडी, ता. भातकुली, जि. अमरावती येथे झाला असून त्यांच्या मृत्यु पश्चात अर्जदारां शिवाय इतर कोणीही वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामाकरीता मयत रामराव महादेव मानकर यांच्या वारस प्रमाणपत्राची गरज आहे म्हणुन प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**०३.** प्रस्तुतच्या अर्जकामी आमजनते कडून अथवा हरकतदार कडून हरकत प्राप्त करण्यासाठी दिनांक ०९/०४/२०२६ रोजी दैनिक वृत्तपत्र "बातमीपत्र'' यामध्ये जाहीर नोटीस प्रकाशित करण्यात आली तसेच ग्रामपंचायत कार्यालय निंभा, ता. भातकुली, जि. अमरावती येथे जाहीर प्रकटन डकवण्यात आले परंतु आम जनतेकडुन किंवा हरकतदार कडुन कोणतीही हरकत प्राप्त झालेली नाही. त्यामुळे प्रकरण एकतर्फी चालविण्यात आले.

**०४.** अर्जदारचे विद्वान विधिज्ञ श्री.एच.आर.शेख यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे बारकाईने अवलोकन केले.

**०५.** अर्जदारने आपल्या अर्जातील कथन सिद्ध करण्यासाठी अर्जदार यांनी सा.क्र.०१ म्हणुन अर्जदार क्र.०२ प्रकाश रामराव मानकर यांना नि.क्र.१० वर तपासले. तसेच कागदोपत्री पुरावा म्हणून मयत रामराव महादेव मानकर यांच्या मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत (नि.क्र.११), अर्जदार क्र.०१ ते ०३ यांच्या आधारकार्डची सत्यापीत प्रत (अनुक्रमे

नि.क्र.१२ ते नि.क्र.१४), दैनिक वृत्तपत्र "बातमीपत्र" मध्ये प्रकाशित करण्यात आलेली पावती व जाहीर नोटिसची मूळ प्रत (अनुक्रमे नि.क्र.१५ व नि.क्र.१६) यांचा आधार घेतला.

**०६.** अभिलेखावरील कागदपत्राचे आणि पुराव्याचे अवलोकन केल्यानंतर असे दिसुन येते की, अर्जदार क्र.०१ ही मयत रामराव महादेव मानकर याची पत्नी आहे तर अर्जदार क्र.०२ व ०३ हे मयताची आपत्ये आहेत. मयत रामराव महादेव मानकर यांचा मृत्यु हा दिनांक ०४.०३.२०२६ रोजी वासेवाडी, ता. भातकुली, जि. अमरावती येथे झाला असून त्यांच्या मृत्यु पश्चात अर्जदारां शिवाय इतर कोणीही वारस नाहीत म्हणुन मी खालील आदेश पारित करीत आहे:–

**आदेश**

१. अर्जदाराचा अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदार क्र.०१ नलुबाई भ्र. रामराव मानकर, अर्जदार क्र.०२ प्रकाश रामराव मानकर व अर्जदार क्र.०३ सुलभा भ्र. कृष्णराव रोकडे हे मयत रामराव महादेव मानकर यांचे एकमेव वारस (Heirs) आहे अशी औपचारीक मान्यता (Formal recognition) देण्यात येते.

३. अर्जदार याला उपरोक्त आदेशाप्रमाणे वारस प्रमाणपत्र नियमानुसार न्यायालयीन शुल्क आकारुन जारी करण्यात यावे.

VIJAY GOVIND PARWARE

Digitally signed by VIJAY GOVIND PARWARE
Date: 2026.07.15 19:23:49 +0530

दिनांक: १५/०७/२०२६

ठिकाण: भातकुली

विजय गोविंद परवरे

**दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर**

**भातकुली, जिल्हा अमरावती**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Order are same word to word, as per the original Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | : | V.M.Bhangale |
| Court name | : | Court of Civil Judge J.D. Bhatkuli. |
| Date | : | 15.07.2026. |
| Order signed by the Presiding Officer on | : | 15.07.2026 |
| Order uploaded on | : | 15.07.2026 |

***